# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.03.2026** **वारः बुधवार**

---

१. पंतप्रधान आज केरळम आणि तामिळनाडूच्या दौऱ्यावर – विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उदघाटन करणार
२. पश्चिम आशियातील अनिश्चततेच्या पार्श्वभूमीवर डॉ एस जयशंकर यांची इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा
३. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या व्यावसायिक वाहतूकीवर विपरित परिणाम
आणि
४. गुजरात, राजस्थानमध्ये तीव्र उष्णतेची लाट तर जम्मू-काश्मीर, लडाख, मुझफ्फराबादमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज केरळम आणि तामिळनाडूला भेट देणार आहेत. केरळममध्ये, एर्नाकुलम इथं एकंदर १० हजार ८०० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते होणार आहे. तमिळनाडूमध्ये, तिरुचिरापल्ली इथं एकंदर ५ हजार ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांच ते उद्घाटन करतील. या प्रकल्पांमध्ये पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू पायाभूत सुविधा, ग्रामीण भागाला जोडणारे प्रकल्प आणि महामार्ग विकास यासारख्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश आहे. पंतप्रधान पाच नवीन रेल्वे सेवांना हिरवा झेंडा दाखवतील आणि जनसभेलाही संबोधित करतील.

**एसजयशंकर**

पश्चिम आशियातील अनिश्चततेच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल संध्याकाळी इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरघची यांच्याशी नव्याने घडणाऱ्या घडामोडींवर सविस्तर चर्चा केली. अशी माहिती त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत दिली आहे. गेल्या महिन्यात इराण आणि अमेरिका-इस्रायल दरम्यान संघर्ष सुरू झाल्यापासून हे त्यांचं तिसरं दूरध्वनी संभाषण होतं. डॉ. जयशंकर यांनी जर्मनीचे परराष्ट्रमंत्री जोहान वडेफुल आणि दक्षिण कोरियाचे परराष्ट्र मंत्री चो ह्युन यांच्याशीही पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा केली.

या परिस्थितीचा जागतिक सुरक्षिततेवर आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे आणि आव्हानात्मक वेळ असताना भारतीय आणि दक्षिण कोरियाच्या नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी दोनही देश करत असलेल्या उपाययोजनांवर संवाद केल्याचं  चो ह्युन यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. द्विपक्षीय आर्थिक सहकार्य दृढ करण्यावर भर देण्यात आल्याचंही या संदेशात नमूद करण्यात आलं आहे.

**ट्रंप**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणने केलेल्या कारवाईच्या वृत्तानंतर अमेरिकन सैन्याने स्फोटक सुरुंग तैनात करण्यासाठी वापरात येणाऱ्या १० इराणी युध्दनौका पूर्णपणे नष्ट केल्या असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या समाजमाध्यमावीरल संदेशांत म्हटलं आहे. जगातील सर्वात महत्त्वाच्या ऊर्जा मार्गांपैकी एक असलेल्या धोरणात्मक जलमार्गावर इराण सुरुंग टाकण्याचा प्रयत्न करू शकतो. याबाबत चिंता वाढत होती या पार्श्वभूमीवर ही कारवाई केल्याचा दावा ट्रंप यांनी केला आहे. दरम्यान, इराणविरुद्ध हा संघर्ष सुरु झाल्यापासून एकंदर १४० अमेरिकन सैनिक जखमी झाले आहेत. पेंटागॉनचे प्रवक्ते शॉन पार्नेल यांनी आठ सैनिक गंभीर जखमी झाले आहेत. असं माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**समुद्रधुनी**
पश्चिम आशियातील संघर्ष दुसऱ्या आठवड्यात पोहोचला आहे, तेलवाहतूकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी व्यावसायिक वाहतूक थांबवण्यात आली आहे, एकंदर १५० टँकर सध्या सामुद्रधुनीबाहेरील मोकळ्या पाण्यात नांगर टाकून उभे आहेत, ज्यात अंदाजे १६ अब्ज लिटर तेल आहे. सामुद्रधुनीजवळ किमान दहा व्यावसायिक जहाजांवर प्रोजेक्टाइल किंवा ड्रोनचा हल्ला झाल्याचे वृत्त आहे, तर पर्शियन आखातात व्यापक जीपीएस यंत्रणा ठप्प होण्याचा धोका वाढला आहे.

फ्रान्सने परिस्थितीला तोंड देण्यासाठी युरोपियन नौदलाकडून प्रतिसाद मिळावा यासाठी काम सुरू केलं आहे. राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी जलमार्गातून व्यावसायिक जहाजांना सुरक्षित ठेवण्यासाठी एक युती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. ही मोहिम तेलवाहतूक आणि जहाजांवरील तेलसाठा सुरक्षित ठेवण्यासाठी आपण प्रयत्न करत असल्याचं म्हटलं आहे. या प्रदेशात युरोपियन नेतृत्वाखालील सागरी सुरक्षा मोहिमेदरम्यान सध्या ऑपरेशन एजेनर सुरु आहे. याचा हा आपत्कालीन विस्तार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पॅरिसने त्यांचं प्रमुख विमानवाहू जहाज, चार्ल्स द गॉल तैनात केलं आहे. ग्रीस, सायप्रस आणि नेदरलँड्सने या मोहिमेत सहभागी होत असल्याचं सांगितलं आहे.

अनेक युरोपीय आणि आखाती देशांनी अमेरिकन हल्ल्यांमध्ये थेट सहभागी होण्याचा धोका पत्करण्याऐवजी फ्रांसच्या नेतृत्वाखालील तालवाहतूक सुरक्षित करण्याच्या प्रयत्नांशी जुळवून घेणं पसंत केले आहे.

**विमान-वाहतूक**
पश्चिम आशियाई क्षेत्रातील घडामोडी आणि भारतातील प्रवसी वाहतूकीवर होणारे संभाव्य परिणाम यावर ते बारकाईने लक्ष ठेवून असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने म्हटलं आहे. विमान कंपन्या बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद म्हणून योग्य व्यवस्था करत आहेत, प्रवाशांची सुरक्षितता आणि सेवांचे सातत्य ही प्राथमिकता आहे. असं एका निवेदनात, मंत्रालयाने म्हटलं आहे. गेल्या सोमवारच्या आकडेवारीनुसार, भारतीय वाहकांद्वारे चालवल्या जाणाऱ्या ४५ इनबाउंड फ्लाइट्स पश्चिम आशियातून भारतात आल्या, ज्यात ७ हजाराहून अधिक प्रवासी परत आले.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालय अतिरिक्त आगमन आणि निर्गमन व्यवस्था सुलभ करण्यासाठी आणि मस्कत आंतरराष्ट्रीय विमानतळाचा मार्गात पर्यायी विमानतळ म्हणून वापर करण्यास परवानगी देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधत आहे. ही व्यवस्था दुबई, अबू धाबी, शारजाह, रस अल खैमाह, अल ऐन, फुजैराह, जेद्दाह आणि मदीना यासारख्या ठिकाणी जाणाऱ्या आणि जाणाऱ्या विमानांना लागू होईल. अशी माहितीही या निवेदनांत देण्यात आली आहे. प्रवाशांनी विमानकंपन्यांनी दिलेल्या सुचनांकडे बारकाईने लक्ष द्यावं असं आवाहनही मंत्रालयानं केलं आहे.

**इंधन**
देशात घरगुती वापराच्या वीज आणि इंधनाची कोणतीही टंचाई नाही, आणि नागरिकांनी घाबरण्याचं काहीही कारण नाही, असा स्पष्ट निर्वाळा काल केंद्र सरकारकडून देण्यात आला. उपलब्ध सर्व मार्गांनी इंधनाचा पुरवठा कायम राखण्यात येईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी समाज माध्यामावरील संदेशात म्हटलं आहे.

इंधन पुरवठ्यातील संभाव्य अडथळ्यांचा आणि LPG पुरवठ्यावरील अडचणींचा विचार करून सरकारनं प्राधान्य क्षेत्रांसाठी नैसर्गिक वायूचं उत्पादन आणि पुरवठा, समान वितरण आणि उपलब्धता नियंत्रित करण्यासाठी “आवश्यक वस्तू कायदा १९५५” अर्थात एस्मा लागू केला आहे. घरगुती एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य देण्यात आलं असून साठेबाजी टाळण्यासाठी दोन सिलिंडर नोंदणीतील कालावधी २५ दिवस करण्यात आला आहे. सरकारनं तेल शुद्धीकरण कारखान्यांना एलपीजी उत्पादन वाढविण्याचा आणि अतिरिक्त उत्पादन घरगुती वापरासाठी उपलब्ध करून देण्याचा आदेश याआधीच जारी केला आहे.

दरम्यान, आंध्र प्रदेशचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री एन. मनोहर यांनी राज्यात एलपीजीची कमतरता नसल्याचं स्पष्ट केलं आहे.  राज्यातील घरगुती आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी पुरेसा गॅस सिलेंडरचा साठा उपलब्ध आहे. जागतिक तणाव आणि टंचाईबद्दलच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी सोमवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दुरस्थ माध्यमातून एलपीजी पुरवठ्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला.

**<u>मुंबई</u>**

एलपीजी सिलिंडर बेकायदेशीररित्या साठवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.

**<u>संसद-एन जलजीवन</u>**

जल जीवन मिशनला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यासाठी ८ लाख ६९ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यातला ३ लाख ५९ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकार देणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

**<u>डीआरडीओ</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना, डीआरडीओ आणि भारतीय नौदलाने संयुक्तपणे गोव्याच्या किनाऱ्यावर पी८आय या संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या विमानातून हवेतून जहाजावर टाकण्यात येणाऱ्या कंटेनर एडीसी-१५० च्या चार यशस्वी इन-फ्लाइट चाचण्या घेतल्या. २१ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ दरम्यान वेगवेगळ्या परिस्थितीत काम करण्याची क्षमता असलेली ही यंत्रणा आहे. एकंदर १५० किलो पेलोड वितरीत करण्यासाठी विकसित केलेले, एअर ड्रॉपेबल कंटेनर किनाऱ्यापासून दूर तैनात असलेल्या समुद्रात संकटात असलेल्या नौदल जहाजांना जलद लॉजिस्टिक्स पोहोचवण्यासाठी तयार करण्यात आलं आहे,

सर्व विकासात्मक उड्डाण चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण झाल्यामुळे, ही प्रणाली लवकरच भारतीय नौदलात समाविष्ट होण्याची अपेक्षा आहे. असं संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

**<u>जोशी</u>**

गेल्या दशकात देशातील बिगर-जीवाश्म स्रोतांपासून स्थापित वीज क्षमता लक्षणीयरीत्या वाढली आहे, ती ८१ गिगावॅटवरून एकंदर २७५ गिगावॅटपर्यंत वाढली आहे. अशी माहिती नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली. काल नवी दिल्ली इथं झालेल्या चौथ्या राष्ट्रीय कृषी-आरई शिखर परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. सौर सिंचनामध्ये भारताच्या कृषी आणि ऊर्जा क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता आहे. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना दिवसा सिंचनाची विश्वासार्ह सुविधा देऊन शाश्वत शेतीला आधार देऊ शकते, तसेच देशाची नवीकरणीय ऊर्जा क्षमता वाढवू शकते. असंही ते म्हणाले.

**<u>स्विस ओपन</u>**

स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धा काल बासेल इथं सुरू झाली. भारताचे अव्वल बॅडमिंटनपटू किदांबी श्रीकांत आणि उन्नती हुडा या स्पर्धेत भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. पुरुष एकेरीमध्ये श्रीकांतचा सामना हाँगकाँगच्या जेसण गुणवान बरोबर होणार असून महिला एकेरीमध्ये उन्नतीचा सामना चीनी तैपेईच्या चिऊ पिन चियान बरोबर होणार आहे. दोन वेळा ऑलंपिक पदक विजेती खेळाडू पी. व्ही. सिंधु मात्र या स्पर्धेत सहभागी होणार नाही.

**<u>हवामान</u>**

गुजरातमध्ये आज तीव्र उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवला आहे. कोकण, गोवा, विदर्भ आणि पश्चिम राजस्थानमध्येही अशीच परिस्थिती अपेक्षित आहे. तर जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान आणि मुझफ्फराबादमध्येही मुसळधार पावसाचा

अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. उद्यापर्यंत हिमाचल प्रदेशात गारपीटीसह वादळाची शक्यता आहे तर ईशान्य भारतात बिहार, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये विजांसह वादळाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार